THANE POLICE COMMISSIONERATE

जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणेशहर पोलीस
P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY
Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalawa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819208279

प्रेस नोट क्र.

दिनांक:-३०/०७/२०२६

'' महाराष्ट्र शासनाचे महसुल व वन विभागामध्ये नोकरी लावण्याचे आमिष दाखवून ७० लाख रुपये घेवून फसवणुक केलेल्या आरोपीतांना गुन्हे शाखेने केले गजाआड !''

तक्रारदार नामे श्री. दर्शन संतोष पाटील, वय २८ वर्षे, रा. रेतीबंदर रोड, काल्हेर गाव, ता. भिवंडी. जि. ठाणे यांना इसम नामे शाम विठोबा खतकर याने महसुल व वन विभागात नोकरी लावुन देतो असे आमिष दाखवुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करण्यासाठी फिर्यादी यांना मंत्रालयातील वरिष्ठ दर्जाच्या शासकीय अधिका-यांचे नावांचे सही व शिक्के असलेले राजमुद्रा असलेली बनावट पत्रे दाखवुन फिर्यादी यांचेकडुन ७० लाख रुपये ऑनलाईन, बॅकेमार्फत व रोखीने घेवुन फिर्यादीच्या नावाचे लिपीक टंकलेखक पदाचे शासकिय अधिका-याचे सही व शिक्का असलेले बनावट नियुक्तीपत्र व ओळखपत्र देवुन, फिर्यादी यांना नोकरीस न लावता त्यांचे पैशांचा अपहार केलेबाबत फिर्यादी यांनी नारपोली पोलीस ठाणे, भिवंडी येथे दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा रजि. नं. ८१४/२०२६, बीएनएस कलम ३१८ (४), ३३६ (२), ३३६ (३),३३८, ३४० (२), ३४२ (१), ३४७ (२), ३५२, ३५१, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमुद गुन्हयात आरोपींची मोठी साखळी असल्याची शक्यता असल्याने सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा, घटक-२, भिवंडी यांचेकडे देण्यात आला, गुन्हयाचे तपासात आरोपीत नामे १) शाम विठोबा खतकर वय ५५ वर्ष, रा. घर नं. ११/२२, सदाशिव जानु पत्राचाळ, स्टॅडर मिल लेन, प्रभादेवी, मुंबई. २) जुगल कुमार लोडाया उर्फ लोधिया वय ३९ वर्ष, रा. रुम नं. ९, द्रोपदी निवास, संतोषीमाता मंदिराजवळ, कोपर रोड, डोंबिवली, पश्चिम, जि. ठाणे ३) रविंद्र दयानीधी शंखुआ वय ५२ वर्ष, रा. चाळ नं. १, रुम नं. १२, नंदु परब चाळ, मातोश्री नगर, मातोश्री शाळेजवळ, चिंचपाडा रोड, कल्याण पुर्व, जि. ठाणे यांना अटक करण्यात आली आहे. **आरोपी सध्या पोलीस कोठडीत असुन, आरोपीतांकडुन मंत्रालयातील विविध विभागाचे वरीष्ठ अधिकारी यांचे नावावे सही व शिक्के असलेले बनावट शासकीय लेटर हेड व शिक्के जप्त करण्यात आले आहेत. नमुद गुन्हयात पाहिजे आरोपींचा शोध चालु असुन, अटक आरोपीत यांनी अशा प्रकारे आणखी किती नागरीकांची फसवणुक केली आहे तसेच अटक आरोपीत यांनी मंत्रालयातील विविध शासकीय विभागाचे अधिकारी यांचे सही व शिक्यांची पत्रे कोठुन प्राप्त केली याबाबत तपास चालु आहे.**

नमुद आरोपीत यांची गुन्हेगारी पार्श्वभुमी असुन, त्यांचेविरुध्द यापुर्वी शासकीय अधिकारी यांचे नावाच्या सहया व शिक्यांचा वापर करुन नागरीकांना नोकरी लावण्याचे आमिष दाखवुन फसवणुक केलेबाबत खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) आरोपीत शाम विठोबा खतकर याचेविरुध्द दाखल गुन्हे

अ. क्र.	पोलीस ठाणे	गुरनं.व कलम
१	एमएचबी पो.स्टे, मुंबई	गुरनं.१३७/२००९ भादविक.४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४
२	एमएचबी पो.स्टे.मुंबई.	गुरनं.१३९/२००९ भादवि कलम ४६७, ४६८, ४७१, ४२०,
३	एमएचबी पो.स्टे. मुंबई.	गुरनं.००/२०११ भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५
४	काशीमीरा पो.स्टे	गुरनं.१६५/२०११ भादविक ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४
५	सावंतवाडा पो.स्टे.	गुरनं.१५१/२०१७ भादवि कलम ४२०, ५०७, ३४
६	दादर पो.स्टे., मुंबई	गुरनं.१७४/२०२३ भादविकलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४

७	विनोबा भावेनगर पोस्टे.	गुरनं.८०/२०२३ भादविक ४२०, ४६७, ४६८, ४७१, ४१९, १७०, ३४
८	कोपरी पो.स्टे.	गुरनं.८०/२३ भादविक ४२०, ४६७, ४६८, ४७१, ४१९, ३४
९	कफ परेड पो. स्टे	गुरनं.१२१/२०२३ भा.न्या.सं.कलम ३१८ (४), ३३६ (२), ३३६ (३), ३१९ (२), ३३७, ३(५)

२) आरोपीत जुगल कुमार लोडाया **याचेविरुध्द दाखल गुन्हे**

अ. क्र.	पोलीस ठाणे	गुरनं.व कलम
१	वर्तकनगर पोलीस ठाणे	गुरनं. १३६/२०२३ भादवि कलम ३०६, ४२० .
२	कफ परेड पो.स्टे.	गुरनं.१२१/२०२३ भा.न्या.सं.कलम ३१८ (४), ३३६ (२), ३३६ (३), ३१९ (२), ३३७, ३(५)

३) आरोपीत रविंद्र दयानीधी शंखुआ याचेविरुध्द दाखल गुन्हे

अ. क्र.	पोलीस ठाणे	गुरनं.व कलम
१	वर्तकनगर पोलीस ठाणे	गुरनं. २१५/२०२१ भादविक ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४
२	वसमत पो.स्टे.हिंगोली	१३८/२०२१ भादविक ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४

सदरची कामगीरी ही श्री.आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे, डॉ. श्री. पंजाबराव उगले, पोलीस सह आयुक्त, गुन्हे, ठाणे, श्री.अमरसिंह जाधव, पो.उप आयुक्त, गुन्हे, ठाणे व श्री. शेखर बागडे सहा.पो. आयुक्त, शोध-१, गुन्हे, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा,घटक-२ भिवंडीचे वपोनिरी.श्री.शितल राऊत, सहा.पोलीस निरीक्षक अजय कुंभार, श्रीराज माळी, मिथुन भोईर, पोउपनिरी. रविंद्र पाटील, सहापोउपनिरी. सुधाकर चौधरी, पोहवा सुदेश घाग, शिवाजी मुर्तडक, प्रशांत राणे, प्रकाश पाटील, साबिर शेख, निलेश बोरसे, राजेश गावडे, वसंत चौरे,शशिकांत यादव, मपोहवा/ माया डोंगरे, अश्विनी पाटील,दक्षता सुतार, सायली गंभेरा, पोशि/ संजय चव्हाण, अमोल इंगळे, विजय कुंभार, भावेश घरत, नितीन नंदिवले, सर्फराज तडवी यांनी केलेली आहे.

तरी नागरीकांना अवाहन करण्यात येते की, अशाप्रकारे शासकीय नोकरी लावुन देण्याचे आमिष दाखवुन नागरीकांची फसवणुक करणारे इसमांबाबत काही माहिती प्राप्त झाल्यास तात्काळ पोलीस विभागाकडे संपर्क करण्यात यावा.